# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.06.2026** **वारःशुक्रवार**

---

1. फ्रान्स आणि स्लोव्हाकिया या दोन देशांचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी दिल्लीकडे रवाना
2. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेअंतर्गत 2 हजार 400 कोटी रुपयांचा प्रोत्साहनपर निधी आज पंतप्रधान वितरीत करणार
3. संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेत पाकिस्ताननं जम्मू आणि काश्मीरबाबत केलेले आरोप भारताने स्पष्ट शब्दात फेटाळले आणि
4. इराणी बंदरे आणि सागरी भागात येजा करणाऱ्या जहाजांवरील सागरी नाकेबंदी अमेरिकेकडून मागे

**<u>पंतप्रधान-पॅरीस</u>**

फ्रान्स आणि स्लोव्हाकिया या दोन देशांचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी दिल्लीकडे रवाना झाले आहेत. आगामी काळात भारत-फ्रान्स मैत्री अधिक दृढ होईल; परस्पर सहकार्य आणि फलनिष्पत्तीच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वाचा ठरला असं पंतप्रधानांनी समाज माध्यमांवरच्या संदेशात म्हटले आहे. पॅरीस भेटीत काल पंतप्रधानांनी व्हिवाटेक 2026 परिषदेला संबोधित केलं. तसंच पॅरिस इथल्या भारतीय समुदायालाही संबोधित केलं. भारत नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाचं केंद्र म्हणून उदयाला येत आहे, असं सांगून जागतिक नवोन्मेषकांना भारतासमवेत काम करण्याचे आणि सर्वांसाठी योगदान देण्याचे आवाहन पंतप्रधानांनी व्हिवाटेक परिषदेत केले. तर भारत आज नवोन्मेष, तंत्रज्ञान आणि सर्वसमावेशक विकासाच्या माध्यमातून भावी पिढ्यांसाठी संधी निर्माण करत आहे, असं पंतप्रधान मोदी यांनी पॅरिस इथल्या भारतीय समुदायाला संबोधित करताना सांगितलं. अनिश्चतता आणि परिवर्तनाच्या काळात भारत फ्रान्स यांच्यातील भागीदारी ही विश्वास, स्थैर्य आणि सहकार्य यांचा सशक्त आधारस्तंभ असल्याचं मोदी म्हणाले. पुढील वर्षी दोन्ही देश तृष्णा या उपग्रहाचं प्रक्षेपण करणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<u>मॅक्रॉ</u>**

दरम्यान, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदींना हिंदीतून निरोप देणारी चित्रफित प्रसिद्ध केली. त्यामध्ये प्रिय मित्र अशी सुरुवात करून मोदी यांचा हा दौरा फलदायी ठरल्याचे आणि पुढील वर्षी फेब्रुवारीत पुन्हा भेटण्यास उत्सुक असल्याचे संदेशात नमूद केलं आहे.

**<u>पीएमव्हीबीआरवाय</u>**

दिल्लीत आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेअंतर्गत 2 हजार 400 कोटी रुपयांचा प्रोत्साहनपर निधी वितरीत होणार आहे. याचा लाभ 15 लाखांहून अधिक लाभार्थ्यांना होणार आहे. गेल्या वर्षी ऑगस्टपासून या योजनेअंतर्गत 63 लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांना औपचारिक रोजगार मिळवून दिले गेले, त्यामध्ये 30 टक्के महिला आहेत, असं कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी सांगितलं. ज्या तरुणांना पहिली सरकारी नोकरी मिळेल त्यांना 15 हजार रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनपर अनुदान दोन हप्त्यांमध्ये वितरीत केले जाणार आहे असंही मांडवीय यांनी सांगितलं.

**<u>पंतप्रधान-किसान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या पश्चिम बंगालमध्ये पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा 23वा हप्ता जारी करतील. देशभरातील जवळपास साडेनऊ कोटीं शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये 18 हजार कोटीं रुपयांहून अधिक रक्कम थेट जमा होणार

आहे, अशी माहिती कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने दिली आहे. हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर इथं होणाऱ्या कार्यक्रमामध्ये पंतप्रधानांच्या हस्ते कृषी क्षेत्रातील महत्त्वाचे उपक्रमांची सुरुवात होणार आहे.

**<u>राष्ट्रपती-सिकलसेल</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज मध्य प्रदेशमध्ये आंतरराष्ट्रीय सिकल सेल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. त्यानंतर, ओडिशामध्ये त्यांच्या हस्ते विविध विकास कामांचं भूमीपूजन होणार आहे. प्रजापिता ब्रह्मकुमारीज संस्थेने आयोजित केलेल्या आध्यात्मिक जागृतीद्वारे आदिवासी समाजाची सक्षमीकरण या कार्यक्रमाला राष्ट्रपती काल उपस्थित राहिल्या. निसर्गाशी आणि आध्यात्मिक मूल्यांशी निगडीत जीवनशैली असलेल्या आदिवासी समुदायाचं सक्षमीकरण विकसित भारतासाठी महत्त्वाचं असल्याचं राष्ट्रपती यावेळी बोलताना म्हणाल्या.

**<u>पाकिस्तान</u>**

संयुक्त राष्ट्रांमध्ये पाकिस्तान आणि 'ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कोऑपरेशननं जम्मू आणि काश्मीरचा केलेला उल्लेख आणि त्याबाबत केलेले आरोप भारताने स्पष्ट शब्दात फेटाळून लावले आहेत. संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेची 62वी परिषद काल झाली. जम्मू-काश्मीर हा भारताचा "अविभाज्य भाग होता, आहे आणि सदैव राहील," असं ठाम प्रतिपादन या परिषदेत भारताने केलं. पाकिस्तान सातत्यानं दहशतवादाला खतपाणी घालत आहे, पाकिस्तानात अनेक अंतर्गत समस्या आहेत, त्याचबरोबर पाकव्याप्त काश्मीरमध्ये अशांतता वाढली आहे, या सगळ्यापासून लक्ष विचलित करण्यासाठी पाकिस्तान असले अपप्रचार करत आहे, अशा शब्दात संयुक्त राष्ट्रांमधील भारताच्या स्थायी मिशनच्या प्रथम सचिव अनुपमा सिंह यांनी पाकिस्तानला फटकरलं.

इराणी बंदरं आणि किनारपट्टीच्या भागात ये-जा करणाऱ्या जहाजांवर लावलेली सागरी नाकेबंदी अमेरिकेनं उठवली आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशानुसार ही नाकेबंदी उठवल्याचं अमेरिकेच्या 'सेंट्रल कमांड'ने स्पष्ट केले आहे. इराणशी जवळपास चार महिन्यांपासून सुरू असलेला संघर्ष संपवण्यासाठी आणि या क्षेत्रातील तणाव कमी करण्यासाठी अध्यक्ष ट्रम्प यांनी एका महत्त्वपूर्ण सामंजस्य करारावर काल स्वाक्षरी केली; त्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही घोषणा करण्यात आली आहे. नाकेबंदी उठवण्यात आली असली तरी, कराराच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी अमेरिकेचं नौदल या भागात तैनात राहणार असल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे. दरम्यान इराण आणि अमेरिका यांच्यातला सामंजस्य करार एक ऐतिहासिक दस्तऐवज आहे, सशक्त इराणचा स्पष्ट संदेश यातून अधोरेखित होतो, असं इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी म्हटलं आहे. दोन देशांमध्ये परस्पर आदर असेल तरच शांतता प्रस्थापित होऊ शकते; असं पेझेश्कियान यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>उपराष्ट्रपती-लडाख</u>**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आजपासून तीन दिवसांच्या लडाख दौऱ्यावर जात आहे. हा त्यांचा पहिलाच अधिकृत दौरा आहे. या भेटीदरम्यान ते उद्या स्वमदत गटांशी संवाद साधणार आहेत तसेच सीमेलगतच्या भागात व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रमाअंतर्गत झालेल्या विकास कामांची पाहाणी करणार आहेत. उपराष्ट्रपती लेहमध्ये 21 जून रोजी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्तच्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

**<u>शहा-सर्जिओ गोर</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी दिल्लीत भेट घेतली. या संदर्भात समाज माध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, उभय देशांमधील सहकार्य अधिक बळकट करण्याबाबत विशेषतः दहशतवाद आणि अमली पदार्थांच्या तस्करीला तोंड देणे या संदर्भात दोन्ही नेत्यांदरम्यान सविस्तर चर्चा झाली. शहा यांनी आपल्या संदेशात, दोन्ही देशांदरम्यान जागतिक धोरणात्मक भागीदारी बळकट करून या द्विपक्षीय संबंधांचा फायदा दोन्ही देशांतील जनतेला मिळवून देण्यास दोन्ही देश कटिबद्ध असल्याचं शहा यांनी म्हटलं आहे.

**खरेदी**

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी चार राज्यांसाठी, तेलबिया आणि कडधान्य यांच्या किमान आधारभूत किमतीवर आधारित मोठ्या प्रमाणावरील खरेदीला मंजुरी दिली आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, तामिळनाडू, गुजरात, उत्तर प्रदेश आणि हरियाणा या राज्यांमध्ये ही खरेदी केली जाणार आहे.

**नीट-आढावा**

रविवारी होणाऱ्या नीट पुनर्परिक्षेच्या तयारीचा आढावा काल शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी घेतला. या बैठकीत पुनर्परीक्षा मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात पार पडण्यासाठी सर्व आवश्यक व्यवस्था सुनिश्चित करण्याचे निर्देश सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले. राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या महासंचालकांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय नियंत्रण कक्षाला अहवाल देण्यासाठी मंत्रालयाद्वारे नियुक्त केलेल अधिकारी विविध राज्यात तैनात केले जातील असं प्रधान यावेळी म्हणाले.

**राजनाथ**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते नागपूरमध्ये अंबाझरी इथं यंत्र इंडिया लिमिटेडच्या आवारात १० हजार टन क्षमतेच्या अल्युमिनियम एक्स्ट्रूजन प्रेसची पायाभरणी करणार आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रासाठी ही महत्त्वाची राष्ट्रीय संपत्ती आहे. संरक्षण आणि अवकाश क्षेत्राच्या गरजा पूर्ण कऱण्यासाठी अल्युमिनिअमचे साचेबद्ध भाग तयार करण्याची देशाची क्षमता यामुळे वृद्धिंगत होणार आहे असं संरक्षण मंत्रालयाने म्हटलं आहे.

**स्नूकर**

चीनमध्ये सुरू असलेल्या वर्ल्ड टीम स्नूकर अजिंक्यपद स्पर्धेत कालच्या सामन्यात भारतानं वर्चस्व गाजवलं. गतविजेत्या हाँगकाँग चीन संघाचा 3-1 असा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. चीन 'ए' आणि कोरिया यांच्यातील दुसऱ्या उपांत्य सामन्यातील विजेत्या संघाशी उद्या अंतिम सामन्यात भारताची गाठ पडेल. भारताचा पंकज अडवाणी आणि आदित्य मेहता यांनी उत्तम खेळ केला.

**एफआयएच हॉकी**

न्यूझीलंडमध्ये होत असलेल्या एफआयएच महिला राष्ट्रीय करंडक हॉकी स्पर्धेत काल भारतान उरुग्वेचा 3-2 असा पराभव केला. उरुग्वेच्या सुरुवातीच्या गोलनंतर भारतानं पुनरागमन करत बाजी मारली. भारताच्या दीपिकाने दोन तर दीपिका सोरेंगने एक गोल केला.

**फुटबॉल**

फीफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या ब गटातल्या सामन्यात कॅनडाने काल रात्री कतारवर 6-0 ने मात केली. कॅनडाच्या जोनाथन डेविडने तीन गोल केले. तत्पूर्वी अ गटामध्ये चेकिया आणि दक्षिण अफ्रीका यांच्यातला सामना 1-1 असा बरोबरीत सुटला.

**हवामान**

महाराष्ट्रासह तेलगंण, उत्तर प्रदेशात आजही उष्णतेची लाट कायम राहाण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. तसंच कोकण, गोवा आणि ओडिशामध्ये उष्ण आणि दमट हवामान राहाणार आहे. तर आसाम, मेघालय, सिक्कीममधील काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. उर्वरीत देशभरात पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.